# Research Paper Presented In Conference & Seminar Academic Year 2019-20

Marathwada Shikshan Prasarak Mandal's

# R. B. Attal Arts, Science & Commerce College

Georai Tq.Georai Dist.Beed

## National Seminar
on
## Contemporary Problems in India and Remedies

14th September, 2019

# CERTIFICATE

This is to certify that Dr./Mr./Mrs. तंगलवाड दत्ता माधवराव of कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर, गढी. has Chaired the session /participated / invited lecture / presented paper entitled भ्रष्टाचाराचे ग्रामीण समाजावर झालेले परिणाम. organized by R. B. Attal Arts, in One Day National Seminar on **"Contemporary Problems in India and Remedies"** organized by R. B. Attal Arts, Science and Commerce College, Georai, Dist. Beed on 14th September, 2019.

**Mr. Helambe H.B.**
Convener

**Dr. Rajani Shikhare**
Principal & Organizer

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2019 Special Issue – 200

## Cotemporary Problems in India and Remidies

**Guest Editor :**
Dr. R. V. Shikhare
Principal
R. B. Attal Arts, Science & Commerce College,
Georai, Dist. Beed (M.S) India

**Associate Editors -**
Mr. H. B. Helambe
Mr. B. S. Jogdand
Mr. R. B. Kale
Mr. S. S. Nagare
Mr. R. B. Pagore

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATIO

| | | | |
|---|---|---|---|
| 101 | ग्रामीण महिला सक्षमीकरणात डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांचे योगदान | डॉ. कैलास ठोंबरे व डॉ.राजाभाऊ गायकवाड | 416 |
| 102 | वाढता दहशतवाद आणि भारत | डॉ. केशव लहाने | 422 |
| 103 | जागतिक तापमान वाढ व भारताची राष्ट्रीय सुरक्षा | डॉ. किरण चक्रे | 427 |
| 104 | पर्यावरण प्रदूषण व उपाय | डॉ. राखी सलगर | 434 |
| 105 | शाश्वत विकास आणि भारतीय सद्यस्थिती | डॉ. रमेश वाघमारे | 438 |
| 106 | दहशतवाद : एक गंभीर समस्या | डॉ. साहेब राठोड | 442 |
| 107 | भारतासमोरील आव्हाने : विशेष संदर्भ दारिद्र्य | डॉ. सिद्धेश्वर सटाले | 445 |
| 108 | दहशतवादाचे प्रकार : एक अभ्यास | डॉ. डी.एस.शिंदे | 448 |
| 109 | बेकारी : एक राष्ट्रीय समस्या | डॉ. शिवाजी चौगुले | 452 |
| 110 | समकालीन भारतीय अर्थकारण : समस्या आणि उपाययोजना | डॉ. शिवराज पाटील | 457 |
| 111 | दहशतवाद आणि समाज : एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. सुनिल जाधव | 460 |
| 112 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाय | डॉ. सुरेश सामाले | 463 |
| 113 | दारिद्र्य : देशाच्या विकासापुढील एक समस्या | डॉ. टी.आर.फिसफिसे | 468 |
| 114 | सायबर गुन्हेगारीतून निर्माण होणारा दहशतवाद | डॉ. सुनिता टेंगसे व गोपाळ गांगुर्डे | 473 |
| 115 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाययोजना | गौरव पाटील | 479 |
| 116 | मानवी जीवनावर होणारे पर्यावरण प्रदूषणाचे दुष्परिणाम | डॉ. संदीपान गायके | 484 |
| 117 | भारतीय राजकारण आणि धर्म | डॉ. जे.एस.ढवळे | 487 |
| 118 | भारतातील सायबर गुन्हे : एक अवलोकन | डॉ. जयसिंग सिंगल | 489 |
| 119 | दारिद्र्याचे समाजशास्त्रीय अध्ययन : एक अभ्यास | दलित कांबळे व डॉ. दिपक धारवाडकर | 498 |
| 120 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाययोजना | प्रा. नंदकुमार कुकलारे | 502 |
| 121 | नक्षलवाद : एक समाजशास्त्रीय आकलन | मीना राजपूत व डॉ. जी.एच.बानायत | 508 |
| 122 | कोरडवाहू शेती आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या | डॉ. जयदेव मोहिते | 513 |
| 123 | आदिवासी इतिहासलेखनातील डॉ. शिरवाडकर सर यांचे योगदान | नितीन क्षीरसागर | 516 |
| 124 | इस्लामी व्याजपद्धती - अर्थशास्त्रीय अभ्यास | डॉ. सय्यद मुसा | 519 |
| 125 | भ्रष्टाचार- एक गंभीर समस्या | डॉ. अनंत नरवडे | 522 |
| 126 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य समाजवादातील आर्थिक विचार | प्रा. वितेश निकते | 527 |
| 127 | भ्रष्टाचार आणि क्रीडा स्पर्धा | प्रा. भारत पल्लेवाड | 530 |
| 128 | पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज | डॉ. किरण पिनाटे | 533 |
| 129 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाय | प्रा. आर.एस.पोपळघट | 536 |
| 130 | भारतातील भ्रष्टाचाराची समस्या | प्रा. प्रकाश काळवणे | 541 |
| 131 | सायबर गुन्हेगारी एक सामाजिक समस्या | प्रा. एच.आर.खेत्री | 545 |
| 132 | बालगुन्हेगारी समस्या : समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. आर.बी.काळे व प्रा.जी.टी.मोकासरे | 548 |
| 133 | दहशदवाद : समकालीन प्रश्न आणि उपाय | डॉ. आर.के.काळे | 552 |
| 134 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील समस्यांचे चित्रण | प्रा. संदिप परदेशी | 559 |
| 135 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या समस्या व उपाय | प्रा. इंदू साळुंके | 563 |
| 136 | रत्नागिरी जिल्ह्याचे उत्पन्न आणि दारिद्र्याचे स्वरूप | प्रा.एल.एस.सिताफुले | 568 |
| 137 | स्त्री शिक्षण समस्या व उपाय | प्रा. सीताराम मोगल, भागवत गोरे | 575 |
| 138 | भ्रष्टाचाराचे ग्रामीण समाजावर झालेली परिणाम - एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ मुदखेड तालुका, जिल्हा नांदेड) | डॉ. दत्ता तंगवलवाड | 579 |

RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

# भ्रष्टाचाराचे ग्रामीण समाजावर झालेली परिणाम - एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भाने मुदखेड तालुका, जिल्हा नांदेड)

**डॉ. तंगवलवाड दत्ता माधवराव**
सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर, गढी.
तालुका गेवराई जिल्हा बीड

**प्रस्तावना**

जगातील एक प्राचीन संस्कृती असलेला अद्‌भुतरम्य व विविधतेने नटलेला देश म्हणून भारताचा गौरव संपूर्ण जगभर केला जातो पाच हजार वर्षांपूर्वी संपूर्ण जग अज्ञानाच्या अंधकारात असताना अद्‌भुतरम्य व तत्वदृष्टी समाजरचना भारतातील होती. धर्म व नीतीचे पूर्ण नियंत्रण असल्यामुळे पावित्र्य, ज्ञानार्जन इत्यादी मूल्यांना समाजात विशेष अधिष्ठान होते. जेथे वैराग्य, धर्म, त्याग यांचा त्रिवेणी संगम होतो, तिथे विक्रम व वैराग्य एकमेकांसमवेत आनंदाने नांदत असलेला देश म्हणजे भारत म्हणून ओळखला जात असे. परलोकिक व ऐहिक यांचा सुरेख संगम म्हणजे भारत असे गणले जात असे. सेवा, त्याग, उदारमतवाद परस्पर सहकार्य ज्ञानार्जन, ज्ञानदान, पवित्र, पाप - पुन्य इत्यादी बाबी प्रमाण मानून वर्तनावर नियंत्रण ठेवणारा भारतीय नागरिक आज वेळोवेळी विपतगाणी वर्तन करताना दिसून येतो, त्यातूनच भारतीय समाजासमोर अनेक सामाजिक समस्यांनी गंभीर रूप धारण केलेले असल्याचे दिसून येते त्यापैकीच एक म्हणजे भ्रष्टाचार ही एक भीषण सामाजिक समस्या होय.

आज जगात एकही देश नाही की, ज्या देशात समस्या नाहीत म्हणजेच सामाजिक समस्या सर्वत्रीक स्वरूपाची आहे. सामाजिक समस्येमुळे समाजाचे विघटन होते म्हणून सर्व समस्यांचे समूळ उच्चाटन होणे गरजेचे आहे पण दुर्दैवाने भारतीय समाजात वेगवेगळ्या सामाजिक समस्या गंभीर रूप धारण केलेले असल्याचे दिसते हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून नीतिभ्रष्ट दुरून पिढी उदयाला येत असल्यामुळे या समस्येकडे शासन व सामाजिक पातळीवर गांभीर्याने विचार करणे काळाची गरज होऊन बसलेली आहे ती समस्या म्हणजे जे कष्ट चारही होय भ्रष्टाचार हा मानवी समाजाला लागलेली एक काळवी आणि करून ओळखला जातो आज गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत मजुरा पासून ते मंत्र्यांपर्यंत सर्वजणच भ्रष्टाचारात हात काळे केलेले दिसून येतात मानवी जीवनात ज्या ज्या क्षेत्रात आपला संबंध येतो एक सर्व क्षेत्र भ्रष्टाचाराने असलेले दिसून येतात म्हणून ग्रामीण समाजावर होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या विविध परिणामाचा समाजशास्त्रीय अभ्यास या लघु शोध निबंधात करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधन पद्धती:-** प्रस्तुत संशोधनात समस्येच्या विविध पैलूचे शास्त्रीय अध्ययन करण्यासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला.

**संशोधनाची उद्दिष्टे :-** कोणतेही कार्य यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी काही ठराविक उद्दिष्टांची मांडणी करावी लागते म्हणून प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधनाला विशिष्ट दिशा प्राप्त होण्यासाठी पुढील उद्दिष्टांची मांडणी करण्यात आलेली आहे.

i. भ्रष्टाचाराचे समाजावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
ii. भ्रष्टाचाराचे सार्वजनिक उपक्रमावर झालेल्या विपरीत परिणाम याचा आढावा घेणे.
iii. गरीब- श्रीमंत यांच्यातील वाढत्या दरीचा अभ्यास करणे.
iv. भ्रष्टाचाराच्या विविध क्षेत्रांचा आढावा घेणे.

"RESEARCH JOURNEY" International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

v. भ्रष्टाचार निर्मूलनातील शासकीय भूमिकेच्या आढावा घेणे.

**संशोधनाची गृहितके:-** प्रस्तुत संशोधनात संशोधन कार्याला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी काही गृहीतकाने मांडणी करावी लागते यासाठी प्रस्तुत संशोधनात पुढील गृहितकांची मांडणी करण्यात आलेली आहे.

1) भ्रष्टाचाराची पाळेमुळे समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचली आहेत.
2) सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये सर्रासपणे भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला जातो म्हणून ग्रामीण अर्थव्यवस्थेला मंदीचे सावट आलेले दिसून येते.
3) सर्व पातळीवर व्यक्ती भ्रष्टाचार करताना दिसून येतात परिणामी ग्रामीण भागात पायाभूत सुविधा अजूनही पूर्णपणे विकसित झालेल्या दिसून येत नाहीत.

**संशोधनाची क्षेत्र मर्यादा:-**

प्रस्तुत संशोधनात भ्रष्टाचारचे ग्रामीण जीवनावर काय परिणाम झाले ? याचा आढावा घेण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यातील 10 गावांमधील निवडक उत्तरदात्यांची निवड करण्यात आली असून, नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यातील दहा गावे ही संशोधनाचे क्षेत्र मर्यादा आहे.

**नमुना निवड:-** नमुना म्हणजे नावाप्रमाणे समग्राचा लहानात लहान भाग होय. कोणत्याही समग्राचा अभ्यास करण्यासाठी लहानात लहान भागाची निवड केली असता, माहिती संकल्पना द्वारे निष्कर्षाप्रत जाता येते म्हणून समजाचा लहानात लहान भाग नमुना म्हणून निवडावा लागतो. प्रस्तुत संशोधनात नमुना निवडीच्या सहेतुक नमुना निवड तंत्राचा अवलंब करण्यात आला असून, नांदेड जिल्ह्यातील मुदखेड या तालुक्यातील निवडक दहा गावातील 50 उत्तरदात्याची सहेतुक नमुना निवड तंत्राच्या आधारे निवड करण्यात आली असून प्राप्त झालेल्या प्रतिसादाचे विश्लेषण पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे यासाठी पिंपळकोटा. दरेगाव, पांगरगाव, टाकळी, डोणगाव, कोल्हा, मेंडका, मुगट, वाई, वाडी या गावातील प्रत्येकी पाच उत्तर दात्यांची निवड करण्यात आली असून प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

**तथ्य संकलनाचे साधने:-**

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा आढावा घेण्यात आला असून त्यामध्ये प्रामुख्याने मुलाखत व प्रश्नावली या तंत्रांचा अवलंब करण्यात आला त्याचबरोबर संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र नियतकालिके, आणि विविध वेबसाईट वर उपलब्ध असलेल्या माहितीचा आढावा घेण्यात आला.

**माहितीचे विश्लेषन:-**

नांदेड जिल्ह्यातील मुदखेड या तालुक्यातील निवडक दहा गावातील 50 उत्तरदात्याची सहेतुक नमुना निवड तंत्राच्या आधारे निवड करण्यात आली असून प्राप्त झालेल्या प्रतिसादाचे विश्लेषण पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे यासाठी पिंपळकोटा. दरेगाव, पांगरगाव, टाकळी, डोणगाव, कोल्हा, मेंडका, मुगट, वाई, वाडी या गावातील प्रत्येकी पाच उत्तर दात्यांची निवड करण्यात आली असून प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

मानव हा जगातला सर्व प्राण्यांपेक्षा स्वार्थी व अहंकारी प्राणी मानला जातो संपत्तीच्या लालसेपोटी तो नैतिकता सोडून अनैतिक मार्गाचा अवलंब करतो. कार्ल मार्क्स म्हणतात "संचय प्रवृत्तीही मानवी समस्येचे उगमस्रोत मानले जाते" जागतिकीकरण औद्योगिकीकरण नागरीकरण यामुळे सामाजिक व नैतिक नियंत्रणाच्या अभावामुळे दिवसेंदिवस भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत असताना दिसून येते.भ्रष्टाचार हा सामूहिक म्हणजे

**RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal**
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

संघटितपणे केला जातो. असे असली तरी वैयक्तिक पातळीवर दिवसेंदिवस भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत असलेले दिसून येते. केवळ आर्थिक व्यवहारातील अनैतिकता व अयोग्य व्यवहार म्हणजे भ्रष्टाचार नव्हे, तर विवाहबाह्यसंबंध, शिक्षकांनी अध्यापनातील नेहमीची आणि विद्यार्थ्यांनी परीक्षेत कॉपी करणे, नर्तकीच्या पावल्या देऊन देणारा रखणे, खेळाडू यांना चोर मार्गाने विजयी देणे, या सर्व बाबींना भ्रष्टाचार म्हटले जाते कारण या व्यवहारात मूल्य, तत्त्वे, नीतिनियम, कायदे यांचा विचार न करता मन मानेल असे नियमबाह्य वर्तन केले जाते म्हणून या सर्व बाबी भ्रष्टाचार या प्रकारामध्ये येतात.

सर्वसामान्यपणे पैशाच्या व्यवहारातील गैरप्रकाराला भ्रष्टाचार असे म्हणतात या भ्रष्टाचाराचे मूळ प्रामुख्याने राजकारणात असल्याचे दिसून येते. वाढता भोगवाद, चंगळवाद यामुळे माणसाची विलासी वृत्ती व चैनीच्या वस्तूंचा हव्यास यामुळे माणूस आपली नैतिकता दिवसेंदिवस विसरत चाललेला आहे. उच्च दर्जाचे राहणीमान आणि श्रीमंत होण्यासाठी हव्यासापायी व्यक्ती अवैध मार्गाचा अवलंब करतो त्याला भ्रष्टाचार असे म्हणतात. पैशाची अफरातफर लाचलुचपत कमिशन घोटाळा इत्यादी बाबींना भ्रष्टाचार म्हणून ओळखले जाते यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील मालमत्तेची लूट करण्याबरोबरच सामान्य माणसालादेखील लुटले जाते म्हणून भारतीय समाजव्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार ही एक गंभीर सामाजिक समस्या बनलेली आहे.

**भ्रष्टाचाराची व्याख्या:-** वेगवेगळ्या विचारवंतांनी भ्रष्टाचार म्हणजे काय ? या संदर्भात आपले वेगवेगळे मत प्रतिपादित केलेले आहे ते आपणास पुढीलप्रमाणे सांगता येते.

**1) इलियट व मेरिल यांच्या मते:-**

"प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे व्यक्तिगत लाभासाठी विशिष्ट कर्तव्यात हेतुतः कसूर करणे म्हणजे भ्रष्टाचार होय."

**2) जे नाथ यांच्या मते:-**

"व्यक्तिगत फायद्यासाठी सार्वजनिक कार्यालयाचा दुरुपयोग किंवा गैरवापर करणे म्हणजे भ्रष्टाचार होय."

**3) भ्रष्टाचार प्रतिबंधक समितीने केलेली व्याख्या :-**

"समाजात सार्वजनिक पद किंवा समाजात उपलब्ध असलेल्या एका विशेष दर्जाशी संलग्न व्यक्ती आणि प्रभावाची अनुचित अथवा स्वार्थासाठी उपयोग करणे म्हणजे भ्रष्टाचार होय"

उपरोक्त सर्व व्याख्यावरून हे स्पष्ट होते की स्वतःच्या स्वार्थासाठी पदाचा दुरुपयोग करून कायद्याचे उल्लंघन करणे आणि सार्वजनिक मालमत्तेची लूट करणे तसेच सर्वसामान्य जनतेला लुटणे म्हणजे भ्रष्टाचार होय.

**भ्रष्टाचाराची क्षेत्रे:-**

**1) राजकारण:-** भ्रष्टाचाराची मक्तेदारी असलेले क्षेत्र म्हणून राजकीय क्षेत्राकडे पाहिले जाते सत्तेचा गैरवापर करून पैसा गोळा करणे व निवडणुकीत तो खर्च करणे आणि खर्च झालेला पैसा दाम दुप्पट मिळवणे या चक्रात अडकलेले राजकारणी भ्रष्ट मार्गाचा अवलंब करताना दिसून येतात एका ठराविक गटाचा विकास हे या राजकीय भ्रष्टाचाराची फळ मानले जाते आपल्या मर्जीतील लोकांच्या लाभासाठी शासनाच्या विविध योजनांचा फायदा त्यांना मिळवून दिला जातो आणि त्यांच्याकडून वेगवेगळ्या प्रकारची कामे करून घेतली जातात.

**2) प्रशासकीय क्षेत्र :-**

शासनाच्या विविध खात्यांमध्ये भ्रष्टाचाराने सीमा ओलांडली आहे प्रशासकीय कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस खाते, विकास योजना, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी क्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या बातम्या नेहमीच टीव्ही, वर्तमानपत्रात पाहावयास भेटतात सध्याच्या बीजेपी सरकारने तर सर्वच माजी मंत्र्यांना व आमदारांना जेलमध्ये धाडण्याचा चंग बांधलेला आहे. देशाच्या पंतप्रधान पदापासून ते

ग्रामपंचायतीच्या सदस्या पर्यंत अनेकांना जेलची हवा खाण्याची वेळ आली आहे यावरून भारतीय समाजातील सामान्य पासून ते सर्वोच्च पदावरील व्यक्तींची नैतिकता किती खालावलेली आहे हे सहज स्पष्ट होते

**3) आर्थिक क्षेत्रातील भ्रष्टाचार -**

ज्याच्याकडे संपत्ती अधिक त्याची समाजात प्रतिष्ठा अधिक या समीकरणामुळे पैशाच्या हव्यासापोटी माणूस हव्या त्या मार्गाने पैसे मिळवण्याचा प्रयत्न करतो विविध शासकीय बँकांमधून हजारो कोटींची लूट करून पळणारा विजय मल्ल्या, निरव मोदी सारखे अनेक चोर या देशांमध्ये आपल्याला पहायला भेटतात. त्याचबरोबर खाजगी बँका उघडून, जास्तीच्या व्याजदराचे आमिष दाखवून मुद्दल पळविणाऱ्या अनेक बँका बेपत्ता झालेल्या दिसतात. त्याचबरोबर मोठ्या उद्योजकांनी कोट्यवधी रुपयांचा कर बुडवून शासनाच्या तिजोरीला हजारो कोटींचा फटका दिलेला आहे. अनेक मंत्री ,उद्योजक, आमदार, खासदार यांच्या घरी शेतावर व शैक्षणिक संस्थांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या व कर्मचाऱ्यांच्या नावावर कोट्यवधींची मालमत्ता असलेली दिसून येते. न मोजता येणारी मालमत्ता आली कुठून या गोष्टीचा अभ्यास करणे काळाची गरज आहे अशा प्रकारे अनैतिक मार्गाचा अवलंब करून प्राप्त झालेले धन हे एकीकडे श्रीमंती आणि दुसरीकडे गरिबी दिवसेंदिवस वाढत चालल्याचे आपल्याला सहज लक्षात येते.

**4) धार्मिक क्षेत्रातील भ्रष्टाचार:-**

मानवाने या मार्गाने सहज पैसा मिळवण्याचे साधन म्हणून मंदिराकडे लक्ष वेधले आहे. म्हणजे माणसाने माणसा बरोबरच देवाला सुद्धा सोडले नाही. देवदर्शनासाठी जास्तीचा पैसा मोजला की लवकरात लवकर दर्शन होते ही सहज प्रवृत्ती आहे. हा एक नैतिक भ्रष्टाचार मानला जातो. लोकांना लुटून भ्रष्ट मार्गाने पैसा मिळवून देवाचा सत्यनारायण किंवा देवाचा अभिषेक केला की आपली पाप मुक्ती होते, ही भावना सर्वत्र असल्यामुळे बहुतांश देवाजवळ गर्दी असलेली आपल्याला पाहायला दिसते. देवाजवळ भक्त कमी परंतु लुटारू लोकांचे प्रमाण अलीकडच्या काळात दिवसेंदिवस वाढत असलेले आपल्याला पहायला भेटते त्याचबरोबर मंदिराचे बांधकामाच्या नावाखाली किंवा एखाद्या उत्सवाच्या निमित्ताने लाखो रुपयात गोळा केलेली रक्कम ही 50% देखील खर्च केली जात नाही, ही आजची वास्तविकता आहे. तसेच देवदेवतांची पूजाअर्चा करणारे पुजारी भक्तांनी भक्तिभावाने अर्पण केलेल्या मौल्यवान वस्तू व दागिन्यांची जाहीरपणे लिलाव करतात आणि अल्प किमतीमध्ये लुटून घेतात. एवढेच नव्हे तर भक्तांचे शारीरिक मानसिक आर्थिक शोषण करणारे आसाराम भारतामध्ये अनेक मंदिरांमध्ये क्षणोक्षणी पहायला भेटतात.

**5) शैक्षणिक क्षेत्र :-**

एकेकाळी पवित्र क्षेत्र, पवित्र व्यवसाय, शाळा हे ज्ञानमंदिर म्हणून ओळखले जाणारे पवित्र क्षेत्र म्हणून शिक्षण क्षेत्राकडे पाहिले जात होते, मात्र आज तो एक धंदा बनलेला आहे. सर्व विश्वास नष्ट झाला असून, संस्थाचालक शिक्षक प्राध्यापक हजारो, कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करूत असल्याचे दिसून येते. संस्थेत नोकरी मिळवण्यासाठी वीस ते तीस लाख रुपये मोजावे लागतात, तर शिक्षक शिकवणीच्या नावाखाली लाखो रुपये विद्यार्थ्यांकडून उखळत असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी 50 लाख ते 1 कोटी रुपये मोजावे लागत असल्याचे अनेक पालकांचे मत आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या अनुदानात मोठमोठे गैरव्यवहार केलेले दिसून येतात. खोट्या पावत्या जोडून शासकीय तिजोरीतील रक्कमा लुटल्या जातात. कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन हे त्यांच्या खात्यावर जमा करून

परत लुटून घेतले जाते अशा अनेक प्रकारचे भ्रष्टाचार शैक्षणिक संस्थांमध्ये होत असलेले आपल्याला पहायला भेटतात.

अशा प्रकारे वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे केले जाणारे भ्रष्टाचार म्हणजे एक प्रकारे माणसाला जीवनभर वेगवेगळ्या कामासाठी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या मार्गाने भ्रष्टाचाराच्या बळी पडावे लागते हे स्पष्ट होते.

**भ्रष्टाचाराचे परिणाम:-**

भ्रष्टाचाराची पाळेमुळे देशाच्या कानाकोपऱ्यात पसरले असून त्याचे ग्रामीण भागावर आलेले विपरीत परिणाम आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) ग्रामीण भागात राबवल्या जाणाऱ्या शासकीय योजना या फक्त कागदावरच असलेल्या दिसून येतात म्हणून ग्रामीण भागातील विविध विकासाच्या योजना अजूनही ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचलेल्या नाहीत अनेक शेतकऱ्यांना शेतीच्या अवजारांसाठी विहीर बांधण्यासाठी दिलेले कर्ज हे फक्त कागदावरच असते. प्रत्येक शेतकऱ्याला कसल लाभ भेटलेला दिसून येत नाही म्हणजेच योजनेमध्ये शंभर टक्के भ्रष्टाचार केला जातो हे स्पष्ट होते.

2) भ्रष्टाचारामुळे रस्ता, पाणी, वीज यासारख्या पायाभूत सुविधा अजूनही ग्रामीण भागात पोहोचलेल्या नाहीत. काही गावात तर विजेच्या तारेवर आकडे टाकून वीज वापरली जाते पण या राजरोस कारभाराची दखल शासकीय पातळीवर देखील घेतली जात नाही यावरून शासकीय, अधिकारी व कर्मचारी या बाबतीत उदासीन असलेले दिसून येते.

3) ग्रामीण भारताची पोखरलेली अर्थव्यवस्था हे भारतातील मंदीच्या अनेक कारणांपैकी एक कारण असल्याचे स्पष्ट होते. कारण भारतीय शेती ही दिवसेंदिवस डबघाईला येत असून दिवसेंदिवस शेतीच्या मालाची उत्पादकता, उत्पादन खर्च आणि मिळणारा भाव याचा कधीच मेळ बसलेला नाही.

4) दीनदलित दुबळे यांना मिळणारे आर्थिक अनुदान त्यांनाच भेटली असती तर ग्रामीण दारिद्र्य निर्मूलनाला हातभार लागला असता, पण भ्रष्टाचारामुळे आहे रे व नाहिरे यातील दरी दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. परिणामी गरीब गरीब होत चाललेला आहे तर श्रीमंत श्रीमंत होत चाललेला आहे हे भारतातील भ्रष्टाचाराचे परिणाम म्हणावे लागतील.

5) भ्रष्टाचार निर्मूलनासाठी खुर्चीत बसलेले अधिकारी व कर्मचारी स्वतः भरत असतील तर कुंपणाने शेत खाल्ले आणि दाद न्यावी कुणाकडे अशी म्हणण्याची वेळ भारतीय जनतेवर आलेली आहे.त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेमध्ये भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन होणे शक्य नाही. परिणामी ग्रामीण दारिद्र्य निर्मूलन कधीच होणार नाही असे सहज दिसून येते.

6) भ्रष्ट मार्गाने मिळवलेल्या पैशाच्या बळावर कायदा हातात घेतला जातो परिणामी ग्रामीण भागात अराजकता वाढून ग्रामीण समुदायाचे सामाजिक विघटन होत असलेले दिसून येते.

7) निकृष्ट कामामुळे तलाव, बंधारे पावसाळ्यात कोसळतात परिणामी हजारो व्यक्तींच्या जीविताची व सार्वजनिक मालमत्तेची हानी होत असलेली अनेकदा वर्तमानपत्र आणि टीव्हीवरील बातम्यांमधून स्पष्ट होते यावरूनच भ्रष्टाचाराची मुळे किती खोलवर रुजलेली आहेत हे सहज लक्षात येते निकृष्ट दर्जाच्या बांधकामांना उत्कृष्ट दर्जाचे काम असल्याचे प्रमाणपत्र देणारे अधिकारी देखील यामध्ये आपले हात काळे केल्याचे स्पष्ट होते.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

8) आडत व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्याची मोठ्या प्रमाणात लूट होत असून शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही तसेच संकरीत बियाणांमुळे ते प्रचंड भेसळ असल्यामुळे तसेच बोगस कीटकनाशके पिकांवर फवारली यामुळे पिकाची उत्पादकता घटते परिणामी शेतकऱ्याच्या उत्पन्नात घट होऊन आर्थिक तोटा शेतकऱ्यांना सहन करावा लागतो. थोडक्यात म्हणजे भारतीय ग्रामीण माणूस कर्जात जन्मतो कर्जात जगतो व कर्जातच मरतो असे म्हणावे लागेल याचे मूळ कारण म्हणजे भारतीय समाजात असलेला भ्रष्टाचार होईल.

**उपायोजना :-**

शासकीय पातळीवर कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना करून आज तागायत काहीही उपयोग झालेला नाही प्रतिबंधात्मक उपाययोजना, दंडात्मक उपाययोजना या ऐवजी सुधारणात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करणे काळाची गरज आहे महात्मा गांधींनी सांगितलेली सर्वोदयाची संकल्पना जनमानसात रुजवण्यासाठी समाज प्रबोधनाची आवश्यकता आहे त्याचबरोबर दर दोन ते पाच वर्षांनी प्रत्येक भारतीय नागरिकाच्या मालमत्तेची हिशोब तपासणी झाली पाहिजे. एखाद्या व्यक्तीकडे अमाप पैसा आल्यास अशा व्यक्तीकडे जमणाऱ्या पैशांचे मार्ग आणि त्यांच्याकडे असलेली रक्कम याचा ताळमेळ जुळतो का ? याचा आढावा घेणे काळाची गरज आहे. बेहिशोबी असलेली मालमत्ता दिसून आल्यास अशा व्यक्तीवर केवळ खटले भरून किंवा तुरुंगात डांबून त्यावर उपचार होत नसून अशा व्यक्तींना मरेपर्यंत फाशीची शिक्षा दिल्यास प्रतिबंधात्मक उपचार होऊ शकतो.

**सारांश:-**

थोडक्यात म्हणजे भ्रष्टाचार हा केवळ भारतालाच नव्हे तर संपूर्ण विश्वाला झालेला कॅन्सर असून, त्याचे निर्मूलन करण्यासाठी ज्या भागाला कॅन्सर झालेला आहे तो भागच काढून टाकने गरजेचे आहे त्याचबरोबर उपायोजना मधून सर्वोदयाची संकल्पना जनमाणसात रुजविणे काळाची गरज आहे तरच देशाचे कल्याण होईल. अन्यथा संपत्तीची तपासणी दर दोन ते पाच वर्षांनी करणे गरजेचे आहे तरच भ्रष्टाचार निर्मूलन करण्यात भारत सरकारला यश मिळेल, अन्यथा कुठल्याही उपाय योजना राबवून काहीही फरक पडणार नाही हेही तेवढेच वास्तव आहे.

**निष्कर्ष:-**

1) भ्रष्टाचाराचे प्रमाण भारतीय समाजव्यवस्थेत दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे ग्रामीण भागात अजूनही रस्ता पाणी वीज यासारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. रस्ते केवळ कागदावरच झालेली दिसून येतात.

2) कृषी क्षेत्रातील मंदीला भ्रष्टाचार जबाबदार असल्यामुळे देशावर मंदीचे सावट निर्माण झालेले आहे

3) भ्रष्टाचार निर्मूलनाचा सर्वोत्तम मार्ग म्हणून महात्मा गांधीजीच्या सर्वोदयाची संकल्पना जनमाणसात रुजविणे काळाची गरज आहे, अन्यथा भारतीय समाजात अराजकता माजून सामाजिक विघटन होण्यास भ्रष्टाचार कारणीभूत ठरेल.

**संदर्भ ग्रंथ:-**

1. डॉ.बी.एल. कुराडे, (2009) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स,नागपूर.

2. सुधाताई काळदाते. (2005). भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.
3. डीडी काचोळे. (2005) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, कैलास पब्लिकेशन ,औरंगाबाद.
4. अशोक गोरे.(2015) भारतीय सामाजिक समस्या विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद.
5. डॉ. दिलीप खैरनार (2011) . आधुनिक भारतातील सामाजिक समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
6. पि. के. कुलकर्णी (2001) भारतातील सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad &

M.S.P. Mandal's

# Balbhim Arts, Science & Commerce College, Beed.(MS)

NAAC Reaccredited 'A+' Grade | College with potential for Excellenc | UGC:Mentor College Under PARAMARSH

## ONE DAY NATIONAL LEVEL SEMINAR

on

## The Current Issues in Social Sciences in India (CISSI - 2020)

Organized By

## Department of Social Sciences

7th March 2020

# CERTIFICATE

This is to certifiy that Prof./Dr./Mr./Mrs. Datta Madhavrao Jangalwad

of Arts & Science College Gadhi-Georai has actively participated in **One Day National Level Seminar on 'The Current Issues in Social Sciences in India' (CISSI - 2020),** organized by department of Social Sciences. Balbhim Arts, Science & Commerce College, Beed (MS) held on 7th March 2020. He/She delivered a Key Note Address / a Resource talk / Chaired a session/ Presented a Paper entitled ग्रामीण संयुक्त कुटुंबाचे विघटन - एक समाजशास्त्रीय अभ्यास

| | | | |
|---|---|---|---|
| Dr.G.A.Mohite | Dr.S.S.Undare | Dr.R.K.Kale | Dr.B.D.Kokate |
| Vice Principal | Vice Principal & IQAC Coordinator | Organizing Secretary | I/C Principal & Chief Organizer |

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 Impact Factor - 7.139 Indexed (SJIF)

March 2020 Special Issues- 25 Vol. 2


# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)


Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Chief Editor
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

Editor
Dr. R. K. Kale

Co-Editors
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar



Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

March 2020 Special Issue- 25 Vol. 2

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

**Guest Chief Editor**
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

**Editor**
Dr. R. K. Kale

**Co-Editors**
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

Shaurya Publication, Latur

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25, Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# INDEX

| | | |
|---|---|---|
| 1 | भारतीय अर्थव्यवस्था और वस्तु एवं सेवा कर (जी.एस.टी.)एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>डॉ.संभाजी किसन कदम, डॉ.राजकुमार नागवंशी | 1 |
| 2 | रामदरश मिश्र और आनंद यादव के उपन्यासों में ग्रामीण राजनीति<br>डॉ. अनिल काळे | 9 |
| 3 | तब से अब तक...सोशल मीडिया और मानव<br>डॉ. अनिल काळे | 14 |
| 4 | आंतकवाद कारण और परिणाम<br>प्रा.डॉ.जे.एस.ढवळे | 19 |
| 5. | भारतीय संविधान आणि कलम ३७०<br>प्रा.डॉ. अविनाश पांचाळ | 22 |
| 6. | ग्रामीण विकास में सूचना और तकनीक का योगदान<br>डॉ. एस. एस. बिरंगणे | 27 |
| 7. | उपभोग प्रवत्तीच्यासिध्दाचे विश्लेषणात्मएक अभ्यास<br>प्रा.बोगुलवार ए.एच. | 30 |
| 8. | वर्धा जिल्ह्यातील कृषी घनतेच्या अभिक्षेत्रीय वितरणाचा अभ्यास<br>प्रा. बुद्धघोष मधुकरराव लोहकरे | 33 |
| 9. | भारतीय लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेचे तत्व : एक चिकित्सक विश्लेषण<br>डॉ.चंद्रशेखर काशिनाथ तळेकर | 37 |
| 10. | दहशतवाद - एक समस्या<br>चव्हाण छगण फुला | 40 |
| 11. | "डिजिटल पेमेंट प्रणालीचा अर्थशास्त्रीय अभ्यास"<br>प्रा.डॉ. माणिक चव्हाण | 43 |
| 12. | महाराष्ट्रातील सहकारी बँकांची दशा व दिशा<br>प्रा. अशोकराव नरसिंगराव चित्ते | 48 |
| 13. | नागरिकत्व दुरुस्ती कायदा : मुद्दे, वाद आणि वास्तव<br>डॉ. सौ. सुनीता चक्रधर दळवी. | 53 |
| 14. | जागतिकीकरणानंतर भारतातील शेतकरी आत्महत्या एक आढावा<br>प्रा.नितीन दत्तात्रय दारमोड | 57 |
| 15. | नागरिकत्व दुरुस्ती कायद्यातील अलिकडील समस्या<br>डॉ. वाल्हेकर दत्तात्रय हरिभाउ | 61 |
| 16. | भारतीय अर्थव्यवस्थेवर नोटबंदीचे परिणाम<br>डॉ. ढास डी.के. | 63 |
| 17. | 'ग्रामीण संयुक्त कुटुंबाचे विघटन – एक समाजशास्त्रीय अभ्यास.'<br>डॉ.दत्ता तंगलवाड | 67 |
| 18. | कॅशलेश व्यवहारांचे विविध पर्याय व त्यांचे परिणाम<br>भगवान शंकरराव देशमुख | 71 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25, Vol. 2
March 2020

Peer Reviewed
SJIF

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# 'ग्रामीण संयुक्त कुटुंबाचे विघटन – एक समाजशास्त्रीय अभ्यास.'

डॉ.दत्ता तंगलवाड
समाजशास्त्र विभाग प्रमुख ,कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी, ता.गेवराई जि. बीड

## प्रस्तावना

कुटुंब म्हणजे परस्पराशी नाती असलेला माणसांचा समूह होय. कुटुंब हा समाजातील एक महत्वपूर्ण असा प्राथमिक समुह आहे. मानवाची 'माणूस' म्हणून जडणघडण होण्यास कुटुंबसंस्थाच कारणीभूत आहे. व्यक्तीच्या जीवनावर कुटुंबाचा सर्वात जास्त प्रभाव पडलेला असतो. जन्मापासून मृत्यूपर्यंत व्यक्तीचा कुटुंबाशी संबंध येतो. व्यक्तीचे पालनपोषन, संरक्षण व समाजिकरण यामध्ये कुटुंबाचा महत्वाचा वाटा असतो. व्यक्तीच्या विविध गरजांची पुर्ती कुटुंबाद्वारे केली जाते. कुटुंबाच्या ह्या महत्वपूर्ण कार्यामुळेच प्रत्येक समाजात कुटुंबसंस्था आढळून येते. विवाह हा कुटुंबाचा आधार आहे, कारण कुटुंबामध्ये पती–पत्नी व त्यांच्या मुलांचा समावेश होतो. तसेच कुटुंबातील सर्व सदस्य एकाच निवासस्थानात राहतात. त्यांच्यात परस्परसंबंध असून हक्क व कर्तव्याची जाणीव असते. कुटुंब ही सार्वत्रीक स्वरूपाची सामाजिक संस्था असली, तरी तिचे स्वरूप समाजानुरूप वेगवेगळे असते. काही कुटुंबात माता–पिता व त्यांची अविवाहित मुले एकत्र राहताना दिसतात. तर काही कुटुंबात तीन ते चार पिढयांचे सदस्य एकत्र राहत असल्याचे आढळतात. काही कुटुंब पितृसत्ताक तर काही मातृसत्ताक असतात. याच आधारावर कुटुंबाचे प्रकार पाडले जातात. प्रामुख्याने पितृसत्ताक कुटुंब, मातृसत्ताक कुटुंब, सदस्यसंख्येनुसार संयुक्त कुटुंब, विभक्त कुटुंब अशा प्रकारे वेगवेगळे प्रकार पडतात. प्रस्तुत लघुशोध निबंधात कुटुंबाच्या विविध प्रकारापैकी संयुक्त कुटुंबाच्या सध्यस्थितीचे अध्ययन करण्यात आले आहे.

### संशोधन विधान :–

**'ग्रामीण संयुक्त कुटुंबाचे विघटन–एक समाजशास्त्रीय अभ्यास.'** या विषयाच्या अनुषंगान प्रस्तुत विषयाची मांडणी करण्यात आली.

### संशोधन अध्ययनाची उद्दिष्टे:–

1. ग्रामीण भागात संयुक्त कुटुंब पध्दती टिकून आहे काय? याचा शोध घेणे.
2. ग्रामीण संयुक्त कुटुंबात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
3. संयुक्त कुटुंबाचे सामाजिकरणाच्या प्रकियेतील योगदान अभ्यासणे.

### संशोधन अध्ययनाची गृहितकृत्ये:–

1. ग्रामीण भागात संयुक्त कुटुंब पध्दती विरळ प्रमाणात अस्तित्वात आहे. परंतू संयुक्त कुटुंबाचे स्वरूप पारंपरिक संयुक्त कुटुंब व्यवस्थेसारखे नाही.
2. ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंब पध्दतीच्या विघटनास सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक घटक जबाबदार आहेत.
3. ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंब सामाजिकरणाचे प्रभावी साधन होते, त्यामूळे संस्कारक्षम भावी पिढी घडवली जात असे.

### संशोधन आराखडा :–

प्रस्तूत अध्ययनात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला असून ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंबाच्या विघटना विषयी तथ्यांचे संकलन व विश्लेषन करण्यात आले आहे.

### नमुना निवड पध्दती:–

**'ग्रामीण संयुक्त कुटुंबाचे विघटन–एक समाजषास्त्रीय अभ्यास.'**या विषयाच्या अनुषंगाने माहिती संकलणासाठी गेवराई तालूक्यातील गढी, मिरकाळा, वडगाव ढोक, खांडवी, तळेवाडी या गावातील प्रत्येकी 10

कुटुंबाची निवड करण्यात आली असून, एकूण 50 कुटुंबप्रमुखाच्या मुलाखतीव्दारे सामग्र संकलनासाठी नमुना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

**तथ्य संकलनाची तंत्रे:–**

प्रस्तुत संशोधनात सशोधन कार्य पूर्ण करण्याकरिता प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा वापर करून माहिती संकलित केली. त्यासाठी मुलाखत अनुसूची तंत्राचा अवलंब केला. तसेच संदर्भ ग्रंथ, मासीक वृत्तमान पत्र शासकीय अहवाल, शासकीय संकेतस्थळे, दस्तऐवज, प्रसारमाध्यमांकडून मिळणारी माहिती, वृत्तपत्रे, इत्यादींचा वापर करण्यात आला.

**तथ्य विश्लेषण:–**

उपलब्ध माहितीच्या आधारे निश्चित स्थितीचे विश्लेषण एस.पी.एस.एस. या सांख्यिकीय तंत्राचा वापर करून संकलित माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:–**

संशोधनाची व्याप्ती मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील गेवराई तालूक्यातील गढी, मिरकाळा, वडगाव ढोक, खांडवी, तळेवाडी या गावाच्या अभ्यासापुरतेच मर्यादित आहे. प्रत्येकी गावातील 10 कुटुंबाची निवड करण्यात आली.

**माहितीचे विश्लेषन:–**

संयुक्त कुटुंब पध्दती भारतीय कुटुंबव्यवस्थेचे प्रधान लक्षण आहे. संयुक्त कुटुंब पध्दती ही विविध दृष्टिने उपयुक्त ठरते. संयुक्त कुटुंबात तीन ते चार पिढ्यांचे सदस्य एकत्र राहत असल्याने वृध्द, निराधार, अपंग, विधवा इत्यादी सदस्यांना सामाजिक सुरक्षितता मिळते. कुटुंबात वडिलधारी मंडळीकडून लहान मुलांना चांगले संस्कार मिळतात, त्यांना वळण लावले जाते. त्यामुळे मुलांच्या व्यक्तिमत्वाचा योग्य प्रकारे विकास होतो. तसेच वृध्द व अनुभवी व्यक्तीच्या अनुभवांचा व मार्गदर्शनाचा कुटुंबातील इतर सदस्यांना फायदा होतो. संयुक्त कुटुंबामुळे व्यक्तीच्या अंगी परस्पर सहकार्याची भावना, वडिलधाऱ्यांविषयी अदराची भावना, दुसऱ्यांसाठी कष्ट करण्याची तयारी, उदारता इत्यादी भावना तयार होतात. संयुक्त कुटुंबात अनेक व्यक्ती एकत्र वास्तव्य करत असतात. त्यामुळे कुटुंबप्रमुखाचे आर्थिक व्यवहारावर नियंत्रण असते. कुटुंबाचा कारभार काटकसरीने केला जातो. अशा प्रकारे संयुक्त कुटुंब विविध दृष्टिने फायद्याचे असते. अलीकडे मानवी समाजात आत्मकेंद्रित वृत्ती वाढत आहे. पूर्वी कुटुंबासाठी सर्व काही करण्याची मानसीक तयारी व्यक्ती ठेवत असे. आज मात्र कुटुंबात स्वार्थीपणा वाढत आहे. या स्वार्थासाठी सख्खे नातेवाईक एकमेकांना शह–प्रतिशह देत आहे. वडिलांची संपत्ती कुणाच्या वाट्याला कशी येणार ? यावरून कलह निर्माण होत आहे.या कलहातून कौटुंबिक ताण–तणाव वाढत आहे. परीणामी संयुक्त कुटुंब नामशेस होण्याच्या मार्गावर आहे. मानवी समाजाचा एक अविभाज्य घटक बनलेल्या या कुटुंबसंस्थेचा विविध विचारवंतांनी वेगवेगळया दृष्टिने अभ्यास केला, व वेगवेगळे विचार मांडले, ते आपणास पुढील प्रमाणे सांगता येतील.

**कुटुंबाची व्याख्या:–**

1. **मेक आयव्हर आणि पेज यांच्यामते.–**''लैंगिक संबंधावर आधारलेला, प्रजोत्पादन व बालसंगोपन करणारा टिकावू स्वरूपाचा समूह 'कुटुंब' होय.''
2. **बर्जेस व लॉक यांच्या मते,–** 'विवाहसंबंध, रक्तसंबंध, किंवा दत्तकविधान इत्यादी संबंधानी एकत्र आलेल्या, एकाच घरात राहणाऱ्या, परस्पराशी पती–पत्नी, आई–वडिल, मुलगा–मुलगी, भाऊ–बहिण या सारख्या भूमिकातून व्यवहार करणाऱ्या व्यक्तीच्या प्राथमिक समूहाला 'कुटुंब' म्हणतात.

**संयुक्त कुटुंबाची व्याख्या:–**

**ईरावती कर्वे** यांच्या मते 'ज्या कुटुंबात तीन किंवा त्यापेक्षा अधिक पिढ्यांचे सदस्य एकत्र असतात,एकाच चुलीवर शिजवलेले अन्न खतात, एकाच निवासस्थानात राहून, समान सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यात सामुहिक

**CURRENT GLOBAL REVIEWER ,**

Special Issue 25 , Vol. 2
March 2020

Peer Reviewed
SJIF

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

सहभाग घेतात. या कुटुंबाची सर्व सत्ता जेष्ठ वयोवृध्द व्यक्तिच्या हाती असते. तो कुटुंबप्रमुख म्हणून भूमिका बजावतो. कुटुंबाच्या संपत्तीवर सर्वांची सामुहिक मालकी असते. अशा कुटुंबाला **संयुक्त कुटुंब**' म्हणतात.'

वरील व्याख्यावरून हे स्पष्ट होते की, संयुक्त कुटुंब पध्दती ही विविध दृष्टीने उपयुक्त ठरते. संयुक्त कुटुंबात तीन ते चार पिढ्यांचे सदस्य एकत्र राहत असल्याने वृध्द, निराधार, अपंग, विधवा इत्यादी सदस्यांना सामाजिक सुरक्षितता मिळते. संयुक्त कुटुंबात अनेक व्यक्ती एकत्र वास्तव्य करत असल्यमूळे परस्पर सहकार्याची भावना वृध्दींगत होते. पण आलीकडे मानवी जीवन धावपळीचे व गतिमान झाल्याने, तो एखाद्या यंत्राप्रमाणे धावत आहे. या धावपळीच्या युगात तो स्नेह, जिव्हाळा यापासून दुर जात असल्याचे चित्र दिसत आहे. शिवाय उपभोगतावादी व चंगळवादी संस्कृती वाढत असल्याने जीवनात पैसा, संपत्ती व भौतिक सुख सुविधांना महत्व प्राप्त होत आहे. मग हा पैसा, संपत्ती व भौतिक सुख सुविधा मिळविण्यासाठी मानव मोठा प्रयत्न करत आहे. या प्रयत्नातुन सर्व काही मिळेलच असे नाही. एका बाजुला प्रचंड पैसा, संपत्ती व भौतिक सुख सुविधा आहेत. परंतु धकाधकीच्या जीवनात मानवाला समाधान मिळत नाही. तर दुसीकडे पोटाचा प्रश्न आहे. अशा प्रकारच्या विरोधाभासामुळे आधुनिक काळात मानवी जीवनात काही समस्या उद्भवत आहे. उदा. एकीकडे पैसा नाही म्हणून समाधान नाही, तर दुसरीकडे पैसा आहे पण समाधान नाही. अशा परिस्थितीत तरूण प्रत्यक्ष अप्रत्यक्ष निराशेपाई व्यसनधीनतेकडे वळत आहे. शिवाय अलीकडे स्वार्थीपणा, व्यवहारीपणा, मतलबीपणा, अशा वाढत्या प्रवृत्तीमुळे कौटुंबिक संबंध बिघडत आहे. त्यामुळे कुटुंबातील आपलेपणा, जिव्हाळा, स्नेह, त्याग कमी होत आहे. लोक स्वार्थापोटी, पैसासाठी सख्खे नाते विसरत आहे. तसेच वृध्द, आजारी, निराधार व्यक्तीकडे कुटुंबातील लोक फार आपुलकीने पाहत नाही. थोडक्यात अनेकांना सुख–दुःखात कुटुंबाकडून जो मानसिक आधार मिळायला पाहिजे तो आज मिळत नाही. आधुनिक काळात मनोरंजनात्मक साधनांचा विपरित परिणाम मुलांच्या सामाजिकरणावर होत आहे. तसेच धार्मिक प्रभाव कमी होत असल्याने सभ्यता, नैतिकता इत्यादींचे महत्व कमी होत आहे. याशिवाय आर्थिक व व्यवसायिक ताण–तणाव वाढत आहे. या सर्व परिवर्तनाचा परिणाम कुटुंबाच्या एकतेवर होत असून, कुटुंब प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष विघटनाकडे वाटचाल करत आहे.

कुटुंबाच्या संरचनेत व कार्यात ज्या स्वरूपातून बदल होत आहे.त्याची तीव्रता कमी अधिक प्रमाणात आहे. शहरी कुटुंबात परिवर्तनाची तीव्रता अधिक आहे. तर ग्रामीण भाग देखील त्याला अपवाद कसा असू शकणार. परंतु एक गोष्ट सर्वांनाच मान्य करावी लागेल की, आज समाजात पूर्वीसारखी परिस्थिती राहीलेली नाही. कुटुंबव्यवस्थेत संरचनात्मक–कार्यात्मक बदल झालेले दिसून येतात.

सदरील संशोधन त्याच अनूशंगाने महत्वाचे आहे. त्यात हे जाणून घेण्याचा प्रयत्न आहे की, ग्रामीण भागात संयुक्त कुटुंब पध्दती टिकून आहे काय? की, संयुक्त कुटुंब पध्दतीचे विघटन होत आहे, सामाजिकरण, संस्कार मूल्यसंवर्धनात संयुक्त कुटूंब पध्दतीची भूमिका महत्वाची आहे. त्या तुलनेत विभक्त कुटुंबात या गोष्टींचा अभाव दिसून येतो. संयुक्त कुटुंब पध्दतीते रचनात्मक व कार्यात्मक बदल झालेले आहेत. ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंब पध्दती मध्ये परिवर्तन होण्यास वाढते औधोगीकरण, नागरीकरण,व शहरीकरणाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक घटक देखील कारणीभूत ठरत आहे.

**सैध्दांतिक मांडणीः–**

भारतातील संयुक्त कुटुंब पध्दतीच्या भवितव्या विषयी समाजशास्त्रज्ञांमध्ये जे दोन विचार प्रवाह आहेत, त्यात ई.डब्ल्यु.बर्गेस, टी. बी. वॉटोमोर, कोलण्डा हे विचारवंत म्हणतात, भारतातील संयुक्त कुटुंबपध्दती विघटित होत आहे, तीचे भवितव्य अंधकारमय आहे. भारतीय संयुक्त कुटुंबाची सर्व कार्ये इतर संस्थाकडे हस्तांतरीत झाली आहेत.असा एक मतप्रवाह आहे. तर कोलण्डा असे म्हणतात की," भारतात संयुक्त कुटुंबपध्दतीची संख्या कमी होत आहे व संयुक्त कुटुंबाचे विघटन होत आहे.'दुसरा विचारप्रवाह पहिल्या विचार प्रवाहाच्या विरूध्द आहे. आय.पी. देसाई, के.एम.कपाडिया, इरावती कर्वे यांच्या मते,'संयुक्त कुटुंबात परिवर्तन होत आहे. पण संयुक्त

कुटुंबपध्दतीविषयी लोकांची भावना मात्र बदललेली नाही भविष्यात संयुक्त कुटुंबपध्दती समाप्त होईल, तीचे विघटन होईल असे म्हणणे चुकीचे आहे."

वरील प्रमाणे संयुक्त कुटुंबाविषयी विचारवंतामध्ये मतभेद आहेत. आय.पी.देसाई, के.एम.कपाडिया, इरावती कर्वे यांचे मत असे आहे की, " ग्रामीण भागात संयुक्त कुटुंब पध्दतीचे भविष्य अंधकारमय नाही. लोकांची भावना आजदेखील संयुक्त कुटुंब पध्दतीच्या बाजुने आहे. दुसऱ्या बाजुला बर्गेस, बॉटोमोर, कोलण्डा म्हणतात की,"भारतात संयुक्त कुटुंबपध्दती विघटीत होत आहे. तीचे भविश्य अंधकारमय आहे." वरील दोन विचार प्रवाहाचा संदर्भ घेऊन प्रस्तुत संशोधनाअंती त्या विचार प्रवाहांची पडताळणी केली असता, प्राप्त झालेली महिती निष्कर्ष रुपाने पुढील प्रमाणे मांडणी केली आहे.

**निष्कर्ष:–**

1. वाढते औद्योगीकरण, नागरीकरण,व शहरीकरणामुळे नोकरीच्या शोधात ग्रामीण भागातील तरूणांनी शहरी भागात स्थलांतर केल्यामुळे संयुक्त कुटुंबाचे विघटन झाले.
2. संयुक्त कुटुबाचे पारंपारीक स्वरूप बदलले असून, दिवसेन दिवस विभक्त कुटुंबाचे प्रमाण वाढत आहे.
3. संयुक्त कुटुंबाचे विघटनामुळे कुटुंबातील बल व वृध्दाच्या समस्या वाढलेल्या आहेत. बालवयात होणाऱ्या संस्कारांचा अभाव असल्यामुळे समाजात गुन्हेगारीचे प्रमाण वाढताना दिसून येते.
4. संयुक्त कुटुंबाच्या विघटनामूळे वृध्दाश्रमाची संख्या दिवसेन दिवस वाढताना दिसून येते.
5. कुटुंबात मानसन्माना ऐवजी वेळोवेळी होणाऱ्या अपमानामुळे अनेक वृध्दांनी घरे सोडली आहेत,त्यांच्या वाटयाला हलाकीचे जीवन आले आहे.
6. संयुक्त कुटुंबाचे विघटनामुळे नात्यातील दुरावा वढल्यामुळे प्रेम, आपुली, जिव्हाळा कमी झाला आहे.
7. संयुक्त कुटुंबाचे विघटन झाल्यामुळे कुटुंबातील आपलेपणा, जिव्हाळा, स्नेह, त्याग कमी होत आहे. लोक स्वार्थापोटी, पैसासाठी सख्खे नाते विसरत आहे. तसेच वृध्द व्यक्ती, आजारी व्यक्ती, निराधार व्यक्तीकडे कुटुंबातील लोक फार आपुलकीने पाहत नाही.

**संदर्भ**

1. बोधनकर सुधीर, अलोणी विवेक. (2007) सामाजिक संशोधन पध्दती ,नागपुर ,श्री साईनाथ प्रकाशन.
2. कुलकर्णी पी. के. (1997.) संस्थांचे समाजशास्त्र. नागपुर ,विद्या पब्लिशर्स.
3. खडसे भा. कि. (2000). भारतीय समाज. मुंबई, हिमालय पब्लिशिंग हाऊस.
4. काचोळे दा. धो. (1999.) ग्रामीण समाजरचना. औरंगाबाद, कैलाश पब्लिकेशन.
5. गजेंद्रगड व्ही. एन.(1999) समकालीन भारतीय समाजशास्त्र. कोल्हापुर, फडके प्रकाशन.
6. https//kimantu.live
7. https//mr.m.wikipedia.org.